फक्त कार्यालयीन उपयोगाकरीता

महाराष्ट्र शासन

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन

2017

जिल्हा : गोंदिया

अर्थ व सांख्यिकी संचालनालय

महाराष्ट्र शासन, मुंबई.

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन 2017

जिल्हा : गोंदिया

जिल्हा सांख्यिकी कार्यालय
अर्थ व सांख्यिकी संचालनालय
महाराष्ट्र शासन, गोंदिया.

प्रस्तावना

‘ जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-2017’ या प्रकाशनात अर्थव्यवस्थेतील विविध सामाजिक व आर्थिक क्षेत्रांच्या स्थितीबाबतची जिल्हयाची तालुकानिहाय आकडेवारी देण्यात आली आहे.

2. अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्याच्या प्रयत्नांमुळे या प्रकाशनात समाविष्ट केलेली काही आकडेवारी अस्थायी स्वरुपातील आहे.

3. राज्य शासनाचे राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय संबंधीत विभाग तसेच जिल्हा परिषदेचे संबंधित विभाग यांनी गोंदिया जिल्हयाबाबत उपयुक्त माहिती जिल्हा सांख्यिकी कार्यालयास वेळेत उपलब्ध करून दिल्यामुळे हे प्रकाशन तयार करणे शक्य झाले, त्याकरीता जिल्हा सांख्यिकी कार्यालय,गोंदिया त्यांचे आभारी आहे.

दिनांक-11/05/2018

(न.ह.चव्हाण)
जिल्हा सांख्यिकी अधिकारी
जिल्हा सांख्यिकी कार्यालय
गोंदिया.

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - 2017

जिल्हा : गोंदिया

अनुक्रमणिका

तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
1	2	3
	भाग 1 - समालोचन	
	1. जिल्ह्याचा समग्र आढावा	1 ते 9
	2. दृष्टिक्षेपात जिल्हा	10 ते 1 4
	3. जिल्हा योजनेचा आढावा	15
	जिल्ह्याचा नकाशा	16
	भाग 2 - सांख्यिकीय तक्ते	
1	निवडक निर्देशक	
1.1	जिल्ह्यातील विविध आर्थिक व सामाजिक बाबींचे निवडक निर्देशक	1 ते 5
1.2	जिल्ह्यातील महत्वाची सांख्यिकी	6
2	जिल्हा उत्पन्न अंदाज	
2.1	क्षेत्रवार जिल्हा उत्पन्न व दरडोई जिल्हा उत्पन्न - चालू किंमतींनुसार	7 ते 9
2.2	क्षेत्रवार जिल्हा उत्पन्न-स्थिर (2004-05) किंमतीनुसार	10 ते 12
3	किंमती व सार्वजनिक वितरण व्यवस्था	
	किंमती विषयक आकडेवारी	
3.1	जिल्ह्यातील महत्वाच्या वस्तुंच्या त्रैमासिक सरासरी किरकोळ किंमती	13 ते 14
	सार्वजनीक वितरण व्यवस्था	
3.2	रास्त भाव धान्य दुकाने आणि रेशनकार्ड धारकांची संख्या	15
3.3	अंत्योदय अन्न योजना, दारिद्रय रेषेखालील (अंत्योदय अन्न योजना वगळून) व दारिद्रय रेषेवरील कुटुंबांसाठी अन्नधान्याचे नियतन व उचल	16
4	जमीन व इतर महसूल, स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न/खर्च, बँकिंग, विमा, बचत गट	
	जमीन व इतर महसूल	
4.1 (अ)	गोळा केलेला महसूल (जमीन महसूल, वाढीव, संकिर्ण, जि.प., ग्रा.प., पं.स., सेस, इ.जी.एस., शिक्षण, अकृषीक, सिटी सर्वे, वस्ती वाढ व नझूल)	17
4.1 (ब)	गोळा केलेला महसूल (खाणी, गौणखनिज, मत्स्य, कोर्ट फी व मुद्रांक, बी.बी.डी.आर., नोंदणीपत्र, महसूली, करमणूक, जाहिरात इत्यादी)	17
4.1 (क)	गोळा केलेला महसूल (तगाई, अधिक धान्य, मृद संधारण, वनजमीन कर्ज, अकृषीक कर्ज, आदर्श गृहनिर्माण, पश्चिम पाकिस्तानातून आलेले निर्वासित त्यांची मोडतोड, प्रकल्प ग्रस्तांना, कुळांना दिलेले कर्ज, पूरग्रस्त, जमीन सुधारणा इत्यादी)	18
	स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न/खर्च	
4.2	स्थानिक स्वराज्य संस्थांचे उत्पन्न व खर्च	19
4.3	नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांचे 2016-17 मधील उत्पन्न व खर्च	20

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - 2017

जिल्हा : गोंदिया

अनुक्रमणिका

तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
1	2	3
4.4	ग्रामपंचायतींचे उत्पन्न व खर्च	21
4.5	जिल्हा परिषदचे उत्पन्न व खर्च	22
	बँक व विमा	
4.6	तालुकानिहाय बँक कार्यालये, वर्गीकृत बँकांची संख्या, ठेवी व कर्जे	23
4.7	जिल्ह्यातील आयुर्विमा विषयक आकडेवारी	23
	बचत गट	
4.8	जिल्ह्यातील बचत गटांबाबतची माहिती	24
4.9	जिल्ह्यातील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या मार्फत स्थापित बचत गटांबाबतची माहिती	25
5	कृषी व संलग्न सेवा	
	कृषी	
5.1	जमिनीच्या वापराविषयी माहिती	26
5.2	निरनिराळ्या पिकांखालील क्षेत्र	27 ते 31
5.3	जिल्हयात वितरीत करण्यात आलेले बियाणे	32
5.4	रासायनिक खतांचा वापर	32
5.5	निरनिराळ्या पिकांचे उत्पादन	33 ते 34
5.6	मुख्य पिकांचे दर हेक्टरी अंदाजित उत्पादन	35
5.7	तालुकानिहाय पर्जन्य दिवसांची संख्या व एकूण पर्जन्य	36
	पदुम	
5.8	कृत्रिम रेतन कार्यक्रमाची प्रगती	37
5.9	कृत्रिम रेतन व दुग्ध उत्पादनाची तालुकानिहाय प्रगती	37
5.10	पशुवैद्यकीय संस्थांबाबतची माहिती	38
5.11	मान्यताप्राप्त पशुवधगृहे आणि त्यात कत्तल केलेल्या पशुची संख्या	38
5.12	भूजल मत्स्य व्यवसाय विषयक माहिती	39
5.13	सागरी मत्स्य व्यवसाय विषयक माहिती	लागु नाही
5.14	शासकीय आणि सहकारी दुग्ध शाळांमधील दुग्ध उपउत्पादने	40
5.15	दुग्ध विकास सहकारी संस्थांबाबतची माहिती	40
	जलसंपदा व लाभ क्षेत्र	
5.16	जिल्ह्यातील सिंचनाच्या व पाणी उपसा करण्याच्या सोयी	41
5.17	विविध साधनांखालील ओलिताचे क्षेत्र	41
5.18	सिंचन विहिरी विषयक माहिती	42
5.19	कूपनलिका, हातपंप व विद्युत पंपांविषयी माहिती	42
5.20	जिल्ह्यातील पाटबंधारे विषयक सुविधा (राज्यस्तर पाटबंधारे)	43
5.21	जिल्ह्यातील लघु पाटबंधाऱ्यांच्या कामांविषयक माहिती	44 ते 45

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - 2017

जिल्हा : गोंदिया

अनुक्रमणिका

तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
1	2	3
5.22	मोठे व मध्यम पाटबंधारे प्रकल्पांविषयी माहिती	46 ते 48
5.23	जिल्हयातील लघुपाटबंधारे विषयी सुविधा	49
5.24	जिल्हयातील पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत मृद व जलसंधारण कामांची प्रगती	49
	वने व पर्यावरण	
5.25	जिल्ह्यातील एकूण वनक्षेत्र	50
5.26	जिल्ह्यातील वनांचे वर्गीकरण	50
5.27	सामाजिक वनीकरण कार्यक्रमांतर्गत वृक्षरोपणाचे लक्ष्य व साध्य	51
5.28	वन्यजीव व राष्ट्रीय उद्याने / अभयारण्यांतर्गत प्रकल्पनिहाय क्षेत्र व खर्च	51
5.29	मुख्य व गौण वन उत्पादने व उत्पन्नांविषयी माहिती	52
5.30	संवर्गनिहाय कारखान्यांचा तपशील	53
6	उद्योग व सहकार	
	उद्योग	
6.1	जिल्ह्यातील उद्योगांबाबतचा तपशील	54
6.2	जिल्ह्यातील विविध यंत्रणांकडे उपलब्ध असलेल्या स्वयंरोजगाराच्या योजनांतर्गत लाभ दिलेल्या लाभधारकांची संख्या	54
	रोजगार व स्वयंरोजगार	
6.3	कारखान्यातील कामगारांची दैनिक सरासरी संख्या	55
6.4	रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांतील आकडेवारी	56
6.5	शासकीय कर्मचाऱ्यांची संख्या	57
6.6	निरनिराळया उद्योगांतील रोजगारांबाबतची माहिती	57
	कामगार	
6.7	दुकाने, व्यापारी संस्था व त्यातील कामगारांबाबतची माहिती	58
	सहकार	
6.8	प्राथमिक कृषि सहकारी संस्थांचे कार्य	59
6.9	जिल्ह्यातील कृषि सहकारी बँकांचा तपशील	60
6.10	प्राथमिक कृषि पतपुरवठा संस्थांचा तपशील	61
6.11	जिल्ह्यातील साखरकारखाने विषयक माहिती	61
6.12	विविध प्रकारच्या सहकारी संस्था	62
6.13	सहकारी संस्थांची वित्तीय स्थिती	63
6.14	सहकारी संस्थांची लेखापरीक्षण वर्गाप्रमाणे संख्या	63
6.15	राज्य / जिल्हा कार्यक्षेत्र असलेल्या सहकारी बँकाचे कार्य	64
6.16	बिगर-कृषी सहकारी पतसंस्थांचे कार्य	65
6.17	परवानाधारक सावकारांची संख्या आणि त्यांनी दिलेली कर्जे	65

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - 2017

जिल्हा : गोंदिया

अनुक्रमणिका

तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
1	2	3
	पणन	
6.18	जिल्हा आणि प्राथमिक पणन संस्थांचे कार्य	66
6.19	नियंत्रित बाजारपेठांतील कृषी मालांची वार्षिक आवक	67
6.20	निवडक कृषि मालाच्या त्रैमासिक सरासरी घाऊक किमंती	68
	वस्त्रोद्योग	
6.21	सहकारी सूत गिरण्या, हातमाग व यंत्रमाग यांचा तपशील	69
7	**पायाभुत सुविधा**	
	उर्जा	
7.1	जिल्ह्यातील विजेचा वापर	70
	प्रादेशिक परिवहन व महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन व दळणवळण	
7.2	मोटार वाहनांची आणि अनुज्ञाप्ती धारकांची संख्या	71
7.3	महाराष्ट्र राज्यमार्ग परिवहन महामंडळाची प्रवासी वाहतूक	72
7.4	स्थानिक स्वराज्य संस्थांचे वाहतूक उपक्रम	72
7.5	पोस्ट आणि दूरध्वनी सेवा यांची आकडेवारी	72
	सार्वजनिक बांधकाम	
7.6	रोड प्लॅन 2001-2021 नुसार जिल्ह्यातील रस्तेविकास कार्यक्रमाची प्रगती	73
7.7	प्रकार व पृष्ठभाग यानुसार रस्त्यांची लांबी	73
7.8	तालुक्यातील रस्तेविषयक आकडेवारी (आदिवासी + बिगर आदिवासी क्षेत्र)	74
	पाणी पुरवठा व स्वच्छता	
7.9	पिण्याच्या पाण्याच्या सोयी व टंचाई संबंधी केलेल्या उपाययोजना	75 ते 76
7.10	अनुसूचित जाती व नवबौध्द वैयक्तिक नळ जोडणी	77
7.11	ग्रामीण भागात शौचालयाची सुविधा असणाऱ्या कुटूंबांची संख्या	77
8	**सामाजिक क्षेत्रे व सामुहिक सेवा**	
	शिक्षण	
8.1	जिल्ह्यातील प्राथमिक शाळांबाबतची माहिती	78 ते 80
8.2	जिल्ह्यातील माध्यमिक शाळांबाबतची माहिती	81ते 83
8.3	जिल्ह्यातील उच्च माध्यमिक शाळांबाबतची माहिती	84 ते 86
8.4	शैक्षणिक संस्थांतील अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांची संख्या	87 ते 88
8.5	शैक्षणिक संस्थांतील अनुसूचित जमातींच्या विद्यार्थ्यांची संख्या	89ते 90
8.6	शैक्षणिक संस्थांतील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांची संख्या	91ते 92
8.7	जिल्ह्यातील साक्षरतेचे प्रमाण (2011)	93
8.8	इयत्तानिहाय विद्यार्थ्यांची संख्या	94
8.9	प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांचे उत्तीर्णतेचे प्रमाण	95
8.10	प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण	95

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - 2017

जिल्हा : गोंदिया

अनुक्रमणिका

तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
1	2	3
8.11	शारीरिक शिक्षण महाविद्यालये, क्रीडांगणे, क्रीडा संस्था आणि क्रीडा शिष्यवृत्तीधारक यांबाबतची माहिती	96
8.12	इयत्ता दहावी नंतर विविध क्षेत्रातील उपलब्ध प्रवेश क्षमता	97
8.13	वर्षाच्या सुरुवातीला प्राप्त अजांर्ची संख्या व प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या	97
8.14	जिल्ह्यातील महाविद्यालयांबाबतची माहिती	98ते 99
8.15	व्यावसायिक शिक्षण संस्थांबाबतची माहिती	100
	सार्वजनिक आरोग्य	
8.16	सार्वजनिक व शासन सहाय्यीत वैद्यकीय सुविधांची माहिती	101
8.17	खाजगी वैद्यकीय सुविधांची माहिती	102
8.18	जिल्ह्यात नोंद केलेल्या जन्म व मृत्यूंची संख्या	102
8.19	जिल्ह्यातील प्रसुतीपूर्व तपासणींची संख्या	103
8.20	विविध कारणांनुसार मृत्यूंची संख्या	103
8.21	माता व बाल संगोपन कार्यक्रमांतर्गत लस टोचणी	104
8.22	कुटुंब कल्याण कार्यक्रमाची प्रगती	105
	महिला व बालविकास	
8.23	जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाड्या, कार्यरत सेविका व अंगणवाड्या इमारतींचा तपशिल	106
8.24	जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाड्या व त्यामधील बालके	107 ते 108
8.25	जिल्ह्यातील कार्यरत अंगणवाड्यांमधील कुपोषीत बालकांचे श्रेणीनिहाय वर्गीकरण	109
8.26	एकात्मिक बाल विकास सेवा योजना - माता व बालसंगोपन	110
	दारिद्रय	
8.27	शहरी भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबे	111
8.28	ग्रामीण भागातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबे	111
	गृहनिर्माण	
8.29	विविध गृहनिर्माण मंडळांमार्फत म्हाडाने बांधलेल्या घरांचा तपशिल	112
8.30	राजीव गांधी प्रकल्प ग्रामीण निवारा योजना	112
8.31	प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)	113 ते 114
8.32	घरबांधणीसाठी अर्थसहाय्य योजने अंतर्गत ग्रामीण क्षेत्रात दिलेली घरे	115 ते 116
	सामाजिक न्याय	
8.33	जिल्ह्यातील मागासवर्गीय वसतीगृहे, त्यांची प्रवेश क्षमता व दिलेले प्रवेश	117
8.34	जिल्ह्यातील दलितवस्त्या, त्यामधील लोकसंख्या व दलित वस्त्यांची सुधारणा	118
	अल्पसंख्यांक विकास	
8.35	अल्पसंख्यांक विकास विभागाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांमधील लाभार्थी संख्या	119

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - 2017

जिल्हा : गोंदिया

अनुक्रमणिका

तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
1	2	3
	विशेष सहाय्य	
8.36	महसुल विभागाकडील सामाजिक सुरक्षा योजनांतर्गत केलेले अर्थसहाय्य	120
8.37	संजय गांधी निराधार अनुदान योजनेंतर्गत केलेले अर्थसहाय्य	120
	मदत व पुनर्वसन	
8.38	पुनर्वसन प्रकल्पांची सद्यस्थिती	121
8.39	जिल्ह्यातील दुष्काळामुळे झालेली हानी व पुनर्वसन व्यवस्थापनांतर्गत दिलेले सहाय्य	122
8.40	जिल्ह्यातील आपत्तीमुळे झालेली हानी व आपत्ती व्यवस्थापनांतर्गत दिलेले सहाय्य	122
9	**योजनाविषयक आकडेवारी**	
	विविध विकास योजना	
9.1	जिल्ह्यातील विविध योजनांतर्गत नियतव्यय व खर्चाचा आढावा	123
9.2	विविध विकास शीर्षाखाली झालेला योजनांतर्गत खर्च	123 ते 126
9.3	वीस कलमी कार्यक्रमाची भौतिक प्रगती	127
9.4	खासदार स्थानिक क्षेत्र विकास कार्यक्रम	128 ते 129
9.5	आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (विधानसभा मतदार संघ)	130
9.6	स्थानिक विकास कार्यक्रम (विधान परिषद सदस्य)	130
	महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना	
9.7	महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना	131
9.8	महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेतलेली कामे, त्यावरील रोजगार व खर्च	131
9.9	महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेखाली घेण्यात आलेली प्रकारानुसार कामे व त्यावरील खर्च	132 ते 133
10	संकीर्ण	
	न्याय व प्रशासन	
10.1	पोलिस अधिकारी/ कर्मचारी यांची संख्या	134
10.2	जिल्ह्यात कार्यरत विविध न्यायालये, त्यामधील न्यायाधीशांची संख्या व निकालात काढलेली प्रकरणे	134
	माहिती व जनसंपर्क	
10.3	जिल्ह्यात प्रकाशित झालेली वर्तमानपत्रे व नियतकालिके	135
10.4	चित्रपटगृहे, व्ही.डी.ओ. केंद्र आणि केबलधारक यांची आकडेवारी	135
	निवडणूकीबाबत	
10.5	लोकसभा व विधानसभा निवडणूकी बाबतची आकडेवारी	136
	वित्त	
10.6	जिल्ह्यात गोळा करण्यात आलेला कर महसूल	137
10.7	जिल्ह्यात गोळा करण्यात आलेला मूल्यवर्धीत कर महसूल (व्हॅट)	137
10.8	कोषागारात सादर झालेल्या देयकांचे तपशिल	137

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - 2017

जिल्हा : गोंदिया

अनुक्रमणिका

तक्ता क्र.	विषय	पृष्ठ क्र.
1	2	3
	माहिती व तंत्रज्ञान	
10.9	माहिती व तंत्रज्ञान संबधी तपशिल	138
	पर्यटन	
10.10	जिल्हयातील पर्यटनस्थळांच्या विकासाबाबत सद्यस्थिती	139
10.11	जिल्हयातील पर्यटनस्थळांच्या ठिकाणी असलेल्या सुविधा	139
	भाग-3 गणनाविषयक आकडेवारी	
	जनगणना (लोकसंख्या)	
11.1	लोकसंख्या विषयक निवडक आकडेवारी (नागरी क्षेत्र) (2011)	140
11.2	लोकसंख्या विषयक निवडक आकडेवारी (ग्रामीण क्षेत्र) (2011)	140
11.3	जिल्ह्यातील मागासवर्गीयांची लोकसंख्या	141
11.4	लोकसंख्या आणि वृद्धिदर	141
11.5	शहरांची वर्गवारी आणि त्यांची लोकसंख्या (2011)	142
11.6	मुख्य व सीमांतीक काम करणाऱ्यांचे उद्योग गटनिहाय वर्गीकरण	143
11.7	धर्म व वयोगटानुसार लोकसंख्या	144
	कृषी गणना	
11.8	वहिती धारणेचा प्रकार आणि क्षेत्रफळ गटानुसार वर्गीकरण	145
	पशु गणना	
11.9 (अ)	जिल्ह्यातील एकूण पशुधन (विदेशी व संकरित गाई व बैल)	146
11.9 (ब)	जिल्ह्यातील एकूण पशुधन (देशी व संकरित गाई व बैल)	146
11.9 (क)	जिल्ह्यातील एकूण पशुधन (म्हशी व रेडे)	147
11.9 (ड)	जिल्ह्यातील एकूण पशुधन (इतर पशू)	147
11.10	कृषि अवजारांविषयी माहिती	148
	आर्थिक गणना	
11.11	कृषी व बिगर-कृषी आस्थापना	149
11.12	ढोबळ कार्यस्थितीनुसार आस्थापनांची आणि नियमीत काम करणा-या कामगारांची संख्या	150

भाग-1

समालोचन

जिल्हा : गोंदिया

2017

जिल्ह्याचा समग्र आढावा

1. स्थान व प्राकृतिक रचना :-

1 मे 1999 रोजी भंडारा जिल्हयाचे विभाजन करुन नवनिर्मित गोंदिया जिल्हा अस्तित्वात आला. प्राचीन काळापासून गोंदिया क्षेत्र गोंडराजांच्या अधिपत्याखाली होते. त्यावेळी फार घनदाट जंगले होती. गोंडसमाज येथील मूळ निवासी होता. गोंद व लाख गोळा करुन गावांमध्ये विकणे हा त्यांचा मुख्य व्यवसाय होता. त्यामुळे या शहराला **गोंदिया** हे नांव पडले असावे असा इंग्रज राजवटीमधील कर्मचारी आर.व्ही.रसेल द्वारा लिखित पुस्तकामध्ये उल्लेख आढळतो.

गोंदिया जिल्हा हा मराठी आद्य कवी मुकुंदराज तसेच महानुभाव पंथाचे प्रवर्तक चक्रधर स्वामी यांच्या वास्तव्याने पुनित झालेला आणि संस्कृत महाकवी तथा नाटककार भवभुती यांची जन्मभूमी व कर्मभूमी म्हणून प्रसिध्द आहे. नयनरम्य तलावांनी समृध्द असलेला हा जिल्हा भाताचे कोठार म्हणून सुध्दा प्रसिध्द आहे.

नवनिर्मित गोंदिया जिल्हा वैनगंगेच्या खो-यात वसलेला असून उत्तर अक्षांश 20.39 ते 21.38 आणि पुर्व रेखांश 79.27 ते 80.42 च्या दरम्यान वसलेला आहे. गोंदिया जिल्ह्याच्या पूर्वेकडे राजनांदगांव जिल्हा (छ.ग.), पश्चिम दिशेला भंडारा जिल्हा, उत्तर दिशेला बालाघाट जिल्हा (म.प्र.) व दक्षिण दिशेला गडचिरोली जिल्हा आहे.

गोंदिया शहर हे राज्याच्या राजधानीपासून 1006 कि. मी. अंतरावर असून उपराजधानीच्या ठिकाणापासून 169 कि. मी. अंतरावर आहे. गोंदिया जिल्ह्यातून मुंबई - कलकत्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.53 (जुना राष्ट्रीय महामार्ग क्र.6) आणि नवनिर्मीत कोहमारा –गोंदिया राष्ट्रीय महामार्ग क्र. 753 व बालाघाट-गोंदिया-आमगाव-देवरी राष्ट्रीय महामार्ग क्र. 543 हे तीन राष्ट्रीय महामार्ग गेल्यामुळे दळणवळणाच्या सोयी मोठया प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत.महाराष्ट्राच्या ईशान्य बाजुस वसलेला गोंदिया जिल्हा शिक्षण,साहित्य, शिल्पकला, प्राचीन इतिहास तसेच कृषी आणि निसर्ग सौंदर्याने परिपूर्ण नटलेला असून गंगाझरी, आमगांव, सालेकसा, चांदसुरज, दर्रेकसा, तेढा, देवरी, चिचगड, पिपरखारी, डोंगरगांव, कोरची तथा अर्जुनी/मोरगांव ईत्यादी गांवे सातपुडा पर्वत रांगांच्या श्रृंखलानी वेढलेली असून सर्वात मोठी प्रतापगडची टेकडी आहे. सन 2011 च्या जनगणनेनुसार गोंदिया जिल्हयाचे क्षेत्रफळ 5,234 चौ.कि.मी. असून राज्याच्या एकूण क्षेत्रफळाच्या 1.7 टक्के एवढे आहे.

1.1-भूशास्त्र:-

1. गोदिया जिल्हयातील मृदा मुख्यत: काळी कन्हार, सिहार, मोरांड, खरडी व बरडी प्रकारची आहे. पैकी कन्हार जमीन कमी असून जास्त मोलाची आहे. बरडी कन्हारपेक्षा वेगळी असून चुनखडी मिश्रित व गाठीची आहे. लाल-पिवळसर सिहार जमीन स्फटिकमय दगडाच्या घर्षणापासून निर्माण झालेली आहे. हया जमीनीला उन्हाळयात भेगा पडतात. हलक्या प्रकारच्या सिहार जमीनीस खरडी म्हणतात.
2. वैनगंगा नदीच्या काठावरील भागात काळी कन्हार व प्रथम दर्जाची मोरांड जमीन आढळते. ती खोल थराची, चिकट व आर्द्रता टिकवून ठेवणारी असून त्यात वर्षातून दोनदा पिके घेतल्या जातात. वैनगंगेच्या खो-यात वाळू मिश्रित जमीन आढळते. ती खोल थराची चिकट व आर्द्रता टिकवून ठेवणारी असून भात पिकास योग्य आहे. जिल्हयातील एकूण लागवडीयोग्य क्षेत्राच्या 71 टक्के सिहार जमीन आढळते.
3. मोरांड प्रकारच्या जमीनीमध्ये विशेषत: ज्वारी,गहू व जवस हि पिके घेतली जातात. खरडी व बरडया जमीनीत हलक्या प्रकारच्या भाताचे व काही भागात ज्वारीचे पिक घेतले जाते.सातपुडा पर्वताच्या श्रृंखलांद्वारे अनेक डोंगराळ भाग निर्माण झाल्यामुळे मँगनिज, कायनाईट, सिलिमिनाईट अशा मूल्यवान धातूंचे खनिज मिश्रण असलेली भूगर्भ रचना आढळते.

1.2 खनिज :-

गोंदिया जिल्हा खनिज उत्पादनाच्या दृष्टिने समृध्द आहे. जिल्हयात मोठया प्रमाणावर उच्च व हलक्या प्रतीचे कच्चे मँगनिज आढळते. खनिजामध्ये क्वार्टझ, क्वार्टझाइटस सँड व आयर्न ओर खनिजे आढळतात. गौण खनिजात रेती, इमारती दगड/बोल्डर, विटा व कवले तयार करण्यासाठी लागणारी माती इत्यादी प्रकारची खनिजे आढळतात.2016-17 मध्ये गोंदिया तालुक्यांत क्वार्टझ व क्वार्टझाइटसचे 8745 मे. टन तसेच आमगांव तालुक्यात आयर्न ओरचे 3242 मे.टन उत्पादन झाले.

1.3 - नद्या :-

गोंदिया जिल्हा वैनगंगेच्या खो-यात वसलेला असून वैनगंगा, बाघ, पांगोली, गाढवी, सुर, चंदन व बावनथडी हया नदया वैनगंगा नदीच्या उपनदया आहेत. बाघ नदीची लांबी 130 कि.मी.असून ती चिचगड पहाडातून उगम पावून उत्तरेकडे वाहत जाते. वैनगंगा नदी पूर्वेकडून उगम पावून चपराळा येथे वर्धा नदीला मिळून प्राणहिता नदी म्हणून संबोधून चंद्रपूर जिल्हयापुढे आंध्र प्रदेशामध्ये जावून गोदावरी नदीला मिळते. देवरी तालुक्यातील सिरपूर गावाजवळ बाघ नदीवर मध्यम पाणी पुरवठा प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. तसेच तिरोडा तालुक्यातील कवलेवाडा गावाजवळ वैनगंगा नदीवर धापेवाडा उपसा सिंचन प्रकल्प उभारण्यात आलेला आहे.

1.4 -**प्रशासकीय रचना :-**

गोंदिया जिल्हयाचे प्रशासकीय मुख्यालय गोंदिया आहे. जिल्हयांत एकूण 8 तालुके असून 4 राजस्व विभाग गोंदिया, तिरोडा, अर्जुनी/मोरगांव व देवरी आहेत. गोंदिया राजस्व विभाग अंतर्गत गोंदिया, तिरोडा राजस्व विभाग अंतर्गत गोरेगांव व तिरोडा , देवरी राजस्व विभाग अंतर्गत देवरी, आमगांव, सालेकसा व अर्जुनी/मोरगांव राजस्व विभाग अंतर्गत अर्जुनी/मोरगांव व सडक/अर्जुनी हे तालुके येतात. जिल्हयात 2011 च्या जनगणनेप्रमाणे एकूण 883 वस्ती असलेली गावे, 59 ओसाड गावे व 10 गणना शहरे आहेत.

1.5 -**हवामान व पर्जन्यमान :-**

गोंदिया जिल्हयातील हवामान उष्ण व कोरडे असून डोंगराळ भागातील थंड स्वरूपाचे आहे. येथील उन्हाळा व हिवाळा सारखाच तीव्र असतो. बहुतांशी पावसाचे जास्त प्रमाण जुलै व ऑगष्ट महिन्यात असते. जूनच्या दुस-या आठवडयापासून पावसाची सुरुवात होऊन ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडयापर्यंत पाऊस पडतो. वर्षातील सरासरीच्या 90 टक्के पाऊस हयाच कालावधीत पडतो. 2016-17 मध्ये गोंदिया जिल्हयात 1179.60 मी. मी. पर्जन्य झाल्याचे दिसून येते.

2. वने

2.1 - **वनक्षेत्र :-**

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपुर यांचेकडून प्राप्त झालेल्या महितीनुसार गोंदिया जिल्हयात 2016-17 वर्षामध्ये 2722.75 चौ.कि.मी. वनक्षेत्र आहे. गोंदिया जिल्हयातील एकूण भौगोलिक क्षेत्राच्या जवळ-जवळ 52% वनक्षेत्र आहे. जिल्हयातील बहुतांश वनक्षेत्र तिरोडा, देवरी व अर्जुनी / मोरगांव या तालुक्यातील प्रतापगड टेकडयात समाविष्ट आहे. वनक्षेत्राची राखीव, संरक्षित व अवर्गीकृत अशा 3 भागात विभागणी करण्यात येते. त्यापैकी अवर्गीकृत वनक्षेत्र महसूल विभागाच्या देखरेखीखाली येते. जिल्हयातील एकूण वनव्याप्त क्षेत्रापैकी राखीव वनक्षेत्र 56.4 टक्के,संरक्षित वनक्षेत्र 26.3 टक्के, व अवर्गीकृत वनक्षेत्र 17.3 टक्के आहे. जिल्ह्यातील वनक्षेत्र घनदाट, मध्यम व तुरळक या भागात विभागली असून संदर्भ वर्षामध्ये घनदाट, मध्यम व तुरळक वनक्षेत्राची एकूण वनक्षेत्राशी टक्केवारी अनुक्रमे 43.82 टक्के, 40.64 टक्के व 15.54 टक्के एवढी आहे.

2.2- **वन्यजीव व राष्ट्रीय उद्याने:-**

नवेगांव बांध राष्ट्रीय उद्यान प्रकल्पांतर्गत 129.55 चौ. कि. मी. वनक्षेत्र आहे.तर वन्यजीव अभयारण्यांतर्गत 526.80 चौ. कि.मी. वनक्षेत्र आहे. सन 2016-17 मध्ये नवेगांव बांध राष्ट्रीय उद्यानावर ₹ 3.99 कोटी व वन्यजीव अभयारण्याच्या विकासाकरीता ₹14.50 कोटी निधी खर्च करण्यात आला.

2.3- **सामाजिक वनीकरण**

उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग, गोंदिया यांचेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार जिल्ह्यात 2016-17 करीता 54.23 चौ. कि. मी. जमीनीवर 97125 रोपांची लागवड करण्यात आली आहे.

2.5- **वनोत्पादन :-**

जिल्हयात उत्तम दर्जाच्या सागवनी झाडांची वने आढळून येतात. बिजा, हळदा, तिवस, सिसम, मोह, खैर, गराडी इ. प्रकारचे वनवृक्ष आढळतात. वनात विडयाकरीता तेंदूपाने, मोहाची फुले, लाखाकरिता पळस, डिंकाकरीता काढई, धावडा आणि काथाकरीता खैर इ. उपयुक्त वृक्षे आढळतात. तसेच चराई करीता अनेक भागात कुरणे आहेत. कागद कारखाण्यासाठी बांबू वृक्षांची लागवड फार मोठया प्रमाणावर उंचवटयाच्या परिसरात केली जाते. सामाजिक वनीकरण खात्यामार्फत जिल्हयात डोंगर उतारावर, सपाट जमीनीवर व रस्त्याच्या कडेस मोठया प्रमाणावर सामाजिक वनीकरण कार्यक्रम राबविला जातो.

31 मार्च, 2017 रोजी संपलेल्या वर्षात वनखात्याने जळाऊ लाकडांच्या विक्रीपासून ₹ 11.42 लाख व इमारती लाकडांच्या विक्रीपासून ₹ 930.20 लाख उत्पन्न मिळविले. या शिवाय बांबू, गवत, तेंदूपाने व इतर गौण वन उत्पादनाच्या विक्रीपासून ₹ 2657.92 लाख व इतर सर्व प्रकारच्या शुल्कापोटी ₹17.98 लाख उत्पन्न प्राप्त केले.

3. स्थानिक स्वराज्य संस्था

जिल्हयात 2 नगरपरिषदा, 6 नगरपंचायती व 8 पंचायत समित्या अस्तित्वात आहेत. जिल्हयात 553 ग्रामपंचायती असून त्यातील लोकनियुक्त राखीव सभासदांची संख्या 3,660 व सर्वसाधारण सभासदांची संख्या 1,004 असून एकूण सभासदांची संख्या 4,664 आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेची सन 2016-17 वर्षाची सुरुवातीची शिल्लक धरुन प्रत्यक्ष उत्पन्न अनुक्रमे ₹ 65761.18 लाख आहे व खर्च ₹ 43682.96 लाख असून अखेरची शिल्लक ₹ 22078.22 लाख आहे.

मार्च, 2017 अखेर गोंदिया जिल्हयातील ग्रामपंचायतीचे एकूण उत्पन्न सुरुवातीची शिल्लक धरुन ₹ 12970.20 लाख होते तर खर्च ₹ 7464.34 लाख असून अखेरची शिल्लक ₹ 5505.86 लाख आहे.

मार्च 2017 अखेर जिल्हयात तिरोडा व गोंदिया या दोन ठिकाणी नगर परिषदा असून सुरुवातीची शिल्लक धरुन एकूण उत्पन्न ₹ 24524.81 लाख असून खर्च ₹ 11611.87 लाख होता. तर अखेरची शिल्लक ₹ 12912.94 लाख आहे. जिल्ह्यांत 6 नगरपंचायती आहे.

4. लोकसंख्या

4.1 - 2011 च्या जनगणनेनुसार एकुण व नागरी व ग्रामीण लोकसंख्या :-

2011 च्या जनगणनेनुसार गोंदिया जिल्हयाची एकूण लोकसंख्या 13,22,507 असून त्यापैकी 6,61,554 पुरुष व 6,60,953 स्त्रिया आहेत. जिल्हयातील एकूण लोकसंख्येपैकी ग्रामीण भागात 10,96,577 व नागरी भागात 2,25,930 लोकसंख्या आहे. जिल्हयातील एकूण लोकसंख्येच्या तुलनेत ग्रामीण भागातील लोकसंख्येचे प्रमाण 83 टक्के आहे. नागरी भागातील लोकसंख्येचे प्रमाण 17 टक्के आहे. 2001 मध्ये नवनिर्मित गोंदिया जिल्हयाचा दशवार्षिक वृध्दीदर 8.50 टक्के होता तर 2011 मध्ये 10.14 टक्के एवढा आहे.

नागरी व ग्रामीण लोकसंख्येचे प्रमाण

2011 च्या जनगणनेप्रमाणे गोंदिया जिल्हयातील एकूण लोकसंख्येच्या 83 टक्के लोकसंख्या ग्रामीण भागात तर 17 टक्के लोकसंख्या नागरी भागात आहे. नागरी भागाच्या लोकसंख्येपैकी जवळ-जवळ 72 टक्के लोकसंख्या गोंदिया शहरात व सर्वात कमी लोकसंख्या 2 टक्के आमगांव (खु.) ता. सालेकसा शहरात आढळून येते.



4.2 - स्त्री -पुरुष प्रमाण :-

2011 च्या जनगणनेप्रमाणे गोंदिया जिल्हयात दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या 999 आहे. हेच प्रमाण ग्रामीण भागात 1001 व शहरी भागात 988 आहे. ग्रामीण भागामध्ये देवरी तालुक्यात हे प्रमाण सर्वात जास्त 1,021 तर तिरोडा तालुक्यात सर्वात कमी 982 इतके आहे.



4.3 - अनुसूचित जाती व जमाती :-

2011 च्या जनगणनेप्रमाणे गोदिया जिल्हयातील अनुसूचित जातींची लोकसंख्या 13.3 टक्के व अनुसूचित जमातींची लोकसंख्या 16.2 टक्के आहे .



4.4 - लोकसंख्येची घनता :-

2011 च्या जनगणनेप्रमाणे गोंदिया जिल्हयाकरीता लोकसंख्येचा प्रती चौ.कि.मी. मधील घनता दर 253 एवढी आहे. ग्रामीण भागात गोंदिया तालुक्यात घनता सर्वात अधिक 422 प्रती चौ.कि.मी.असून देवरी तालुक्यात सर्वात कमी 97 प्रती चौ.कि.मी. आढळून येते.

4.5 - कामकरी :-

2011 च्या जनगणने प्रमाणे गोंदिया जिल्हयातील एकूण काम करणा-यांची संख्या 6,65,419 आहे. एकूण काम करणा-या संख्येपैकी 28 टक्के शेतकरी व 42.3 टक्के शेतमजूर आहेत. याशिवाय 4.9 टक्के कामकरी घरगुती उद्योगात गुंतलेले असून, उर्वरित 24.8 टक्के कामकरी घरगुती उद्योगाखेरीज वाहतूक, बांधकाम व व्यापार-व्यवसायात गुंतलेले आढळून येतात. तसेच मुख्य काम करणारे 65.2 टक्के व सिमांतीक काम करणारे 34.8 टक्के आहेत.

मुख्य काम करणा-यांची एकूण काम करणा-यांशी टक्केवारी 65.2 टक्के तर, सिमांतीक काम करणा-यांची एकूण काम करणा-यांशी टक्केवारी 34.8 टक्के आहे. ग्रामीण भागात काम करणा-यांची टक्केवारी 53.3 टक्केतर, काम न करणा-यांची टक्केवारी 49.7 टक्के आहे. हेच प्रमाण नागरी भागात अनुक्रमे 35.9 टक्के व 64.1 टक्के एवढे आहे.

4.6— वयोगट व धर्मानुसार लोकसंख्या :-

2011 च्या जनगणनेप्रमाणे जिल्हयात 0-14 वयोगटात 25.6 टक्के तर, 15 ते 59 वयोगटात लोकसंख्या 64.7 टक्के आहे. 60 ते 80 वर्षांवरील 9.5 टक्के तसेच वय निर्देशित न केलेली लोकसंख्या 0.2 टक्के आहे. 2011 च्या जनगणनेप्रमाणे जिल्हयात 9.4 टक्के बौध्द, 87.3 टक्के हिंदू , 2.0 टक्के मुस्लीम व 1.3 टक्के इतर धर्माची लोकसंख्या आहे.

4.7 - साक्षरता :-

2011 च्या जनगणनेप्रमाणे जिल्हयात 10,04,243 म्हणजेच 85 टक्के लोकसंख्या साक्षर असून, त्यापैकी पुरूष आणि स्त्रिया यांचे प्रमाण अनुक्रमे 92 टक्के आणि 77.9 टक्के आहे. जिल्हयात नागरी भागात 91.5 टक्के व ग्रामीण भागात 83.6 टक्के साक्षरता दिसून येते.



4.8 -दारिद्रय रेषेखालील ग्रामीण कुटुंबे :-

2002 चे सर्वेक्षणानुसार जिल्हयातील ग्रामीण कुटूंबांची एकूण संख्या 2,51,796 एवढी असून,त्यापैकी दारिद्रय रेषेखालील कुटूबांचे प्रमाण 57.3 टक्के आहे. त्यापैकी अनुसूचित जातींचे 17.3 टक्के, अनुसूचित जमातींचे 20.3 टक्के व इतरचे 62.4 टक्के आहे.

5. जिल्हा उत्पन्न अंदाज

5.1-जिल्हा उत्पन्न अंदाज व दरडोई उत्पन्न :-

जिल्हयाचे नियोजनाकरीता जिल्हा उत्पन्नाची अत्यंत आवश्यकता असल्याने जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन या वार्षिक प्रकाशनात गोंदिया जिल्हयाचे अंदाज 2012-13 व 2013-14 प्रकाशित करण्यात येत आहेत. सर्वसाधारणपणे अर्थव्यवस्थेच्या 16 क्षेत्रांचे चालू व स्थिर किंमतींनुसार जिल्हा उत्पन्नाचे अंदाज तयार करण्यात आलेले आहेत. त्याकरिता आवश्यक ती माहिती जिल्हा व राज्य पातळीवरून संकलीत करण्यात आली असून, अर्थव्यवस्थेतील ज्या क्षेत्रातील माहिती जिल्हा पातळीवर स्वतंत्रपणे उपलब्ध होऊ शकत नाही. अशाप्रकारची माहिती राज्य पातळीवर एकत्रितपणे उपलब्ध करून घेण्यात आली आणि संबंधित जिल्हयांचा वाटा अंदाजित करण्यांत आलेला आहे. जिल्हा उत्पन्न अंदाज तयार करतांना आर्थिक उत्पादन क्षेत्राचे 1) प्राथमिक 2) दुय्यम व 3) तृतीय क्षेत्र यानुसार तीन क्षेत्रात विभाजन करून त्यानुसार उत्पन्न विचारात घेण्यात आलेले आहे.

5.2 (1) चालू किंमतीनुसार जिल्हा उत्पन्न

गोंदिया जिल्हयाचे सर्व क्षेत्रातील चालू किंमतीनुसार सन 2013-14) चे स्थूल जिल्हा उत्पन्न ₹ 1020 कोटी आहे. त्याचप्रमाणे निव्वळ जिल्हा उत्पन्न ₹ 9326 कोटी असून निव्वळ दरडोई जिल्हा उत्पन्न ₹ 68,665 आहे. चालू किंमतीनुसार जिल्हयाचे स्थूल व निव्वळ उत्पन्न राज्य उत्पन्नाच्या 0.7 टक्के आहे.चालू किंमतीनुसार जिल्हयाच्या स्थूल उत्पन्नाच्या 14.5 टक्के प्राथमिक क्षेत्रातून, 27.1 टक्के द्वितीय क्षेत्रातून व उर्वरीत 58.4 टक्के तृतीय क्षेत्रातून प्राप्त झालेले आहे.

(2) स्थिर किंमतीनुसार जिल्हा उत्पन्न (पायाभुत वर्ष -2004-05)

गोंदिया जिल्हयाचे सर्व क्षेत्रातील स्थिर किंमतीनुसार सन 2013-14 स्थूल जिल्हा उत्पन्न ₹ 5810 कोटी आहे. त्याचप्रमाणे निव्वळ जिल्हा उत्पन्न ₹ 5266 कोटी आहे. स्थिर किंमतीनुसार जिल्हयाचे स्थूल व निव्वळ उत्पन्न राज्य उत्पन्नाच्या 0.7 टक्के आहे. स्थिर किंमतीनुसार जिल्हयाच्या स्थूल उत्पन्नाच्या 9.6 टक्के प्राथमिक क्षेत्रातून, 30.8 टक्के द्वितीय क्षेत्रातून व उर्वरीत 59.6 टक्के तृतीय क्षेत्रातून प्राप्त झालेले आहे.

आकडेवारीच्या उपलब्धतेचा अभाव, अनुरूप निर्देशकांचा वापर तसेच पध्दतीमधील अंगभूत उणिवा या सर्वामुळे जिल्हा उत्पन्नाचे अचूक अंदाज बांधण्यात मर्यादा येत असल्यामुळे हे अंदाज ढोबळमानाने जिल्हयातील उत्पन्नाची पातळी तपासण्याकरीता वापरावेत.

6. कृषि

6.1- जमिनीचा वापर :-

वार्षिक ऋतु पिके अहवाल सन 2011-12 नुसार जिल्हयाचे एकूण भौगोलीक क्षेत्र 5,18,240 हेक्टर आहे. जिल्हयाचे 2011-12 वर्षातील निव्वळ पेरणी क्षेत्र 2,41,594 हेक्टर असून दुबार पिकाखालील क्षेत्र 32,536 हेक्टर,असे एकूण लागवडीखालील क्षेत्र 2,74,130 हेक्टर आहे. जिल्हयातील निव्वळ पेरणी क्षेत्राचे लागवडीखालील व ओलीताखालील एकूण क्षेत्राचे प्रमाण अनुक्रमे 88.1 टक्के व 36.6 टक्के आहे.

6.2 - कृषि गणना:-

सन 2010-11 च्या कृषी गणननेनुसार जिल्हयात एकूण 2,37,763 वहिती खाती होती व त्याखाली 2,06,586 हेक्टर क्षेत्र होते. त्यापैकी 64.6 टक्के हेक्टर वहिती खाती वैयक्तिक होती. उर्वरीत संयुक्त व संस्थेची वहिती खाती होती. जमीनीचे क्षेत्र व एकूण खाती यांची माहिती पुढील प्रमाणे आहे.

अ.क्र.	धारणगट(हेक्टर)	भूधारक (%)	क्षेत्र (%)
1	0 ते 2	91.8	69.2
2	2 ते 5	7.3	23.7
3	5 ते 10	0.7	5.4
4	10 ते 20	0.1	1.2
5	20 व त्यापेक्षा जास्त	0.0	0.5

6.3 -पिकाचे स्वरूप :-

वार्षिक ऋतु आणि पिके अहवाल 2011-12 नुसार जिल्हयामध्ये एकूण पिकाखालील क्षेत्र 2,74,130 हेक्टर आहे. त्यापैकी तृणधान्य पिकाखाली 86.6 टक्के क्षेत्र आहे.कडधान्य पिकाखाली 7.2 टक्के क्षेत्र आहे. अखाद्य पिकाखालील क्षेत्र 4.2 टक्के आहे. तसेच खाद्य पिकाखालील एकूण क्षेत्र 95.8 टक्के आहे.

6.4 - शेतमाल साठवणुकीच्या व नियंत्रित बाजारपेठेच्या सोयी तसेच महत्वाच्या पिकांचे उत्पादन :-

जिल्हयात सन 2016-17 मध्ये गोंदिया, तिरोडा, आमगांव, अर्जूनी मोरगांव,सडक/ अर्जुनी, देवरी व गोरेगांव येथे 7 नियंत्रित कृषि उत्पन्न बाजार समित्या व गोंदिया येथे दोन आणि अर्जूनी मोरगांव व सडक अर्जुनी येथे प्रत्येकी एक उप बाजार समित्या कार्यरत आहेत. या बाजार समित्या मध्ये धान, तांदूळ, गहू, चना, उडीद, मूग, तूर, मसुर, सोयाबीन, कांदा, पोपट, जवस, व गूळ यांची आवक होते.

जिल्हयात 2016-17 मध्ये भाताचे उत्पादन 2719.39 शंभर मे. टन. तर गव्हाचे उत्पादन 15.87 शंभर मे. टन असून, सन 2015-16 च्या तुलनेत भाताच्या उत्पादनात 6.8 टक्के घट तर गव्हाच्या उत्पादनात 21.2 टक्के वाढ झाल्याचे दिसुन येते.

7. जलसिंचन

7.1 :- वार्षिक ऋतु आणि पिके अहवाल 2011-12 नुसार जिल्हयात कृषी क्षेत्राच्या अस्थायी आकडेवारी नुसार ओलीताखालील स्थुल क्षेत्र 113815 हेक्टर असून त्यापैकी पृष्ठभागीय ओलीत प्रकाराखालील क्षेत्र 91680 हेक्टर होते. ओलीताखालील स्थुल क्षेत्राची लागवडीखालील स्थुल क्षेत्राशी टक्केवारी 41.5% आहे.

7.2 :- जमीनीच्या पृष्ठभागावरील साधने (उदा. लिफ्ट, कालवा) व जमिनीच्या पृष्ठभागाखालील साधने (प्रामुख्याने विहीर) या दोन साधनांनी पिकांना पाणी दिल्या जाते. गोदिया जिल्हयातील इटियाडोह प्रकल्प, सिरपुर प्रकल्प, पुजारीटोला प्रकल्प व कालीसरार प्रकल्प या चार मोठया पाटबंधारे प्रकल्पासाठी 208.25 कि. मी. लांबीचे कालवे पूर्ण झाले असून 2016-17 मध्ये जिल्ह्यामध्ये एकूण 34,511 हेक्टर जमीन ओलीताखाली असल्याचे आढळते.

त्याचप्रमाणे जिल्हयातील बोदलकसा, चुलबंद, चोरखमारा, खैरबंदा, मानागड, रेंगेपार व संग्रामपूर या मध्यम प्रकल्पातंर्गत 162.00 कि. मी. लांबीचे कालवे पूर्ण झाले असून, 2016-17 मध्ये जिल्ह्यात एकूण 20,578 हेक्टर जमीन ओलीताखाली असल्याचे आढळते. इटियाडोह या मोठया पाटबंधारे प्रकल्पाचे पाणी गोंदिया जिल्हयातील अर्जुनी/मोरगांव व भंडारा जिल्हयातील लाखांदूर, तसेच गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील काही तालुक्यातील शेतीला देण्यात येते. कालीसरार प्रकल्पाचे पाणी गोंदिया जिल्हयातील सालेकसा तालुक्यातील शेतीस व मध्य प्रदेशातील शेतीस देण्यात येते. बाघ प्रकल्पातंर्गत सिरपूर धरणातील पाणी देवरी तालुक्यातील शेतीस देण्यांत येते.

7.3 :- गोंदिया जिल्हयात 2011-12 या वर्षामध्ये वापरात असलेल्या सिंचन विहिरींची संख्या 11781 इतकी होती. विहिरीवर ऑईल इंजिन व विजेचे पंप बसवून पिकांना पाणी दिल्या जाते. या अंतर्गत 2011-12 मध्ये विहिरी वरील विद्युत पंपांची संख्या 2384 व डिझेल पंपांची संख्या 1461 होती.

8. पशुसंवर्धन व पशुवैद्यकिय सेवा

8.1 - पशुधन :-

2012 च्या पशुगणनेप्रमाणे जिल्हयातील पशुधन 5,85,168 होते. याशिवाय कुकुट वर्गीय पक्ष्यांची संख्या 3,78,726 होती. या गणनेनुसार एकूण 5,85,168 पशुधनापैकी गायी-बैल 58 टक्के, म्हशी व रेडे 15 टक्के, शेळया-मेंढया इतर पशुधन 27 टक्के आहेत. 2007 च्या तुलनेत पशुधनात घट झाल्याचे दिसून येते.

8.2 - पशुवैद्यकिय सेवा :-

जिल्हयामध्ये 31 मार्च, 2017 रोजी 5 पशुवैद्यकिय चिकित्सालय, 48 पशुवैद्यकिय दवाखाने, 50 पशुवैद्यकिय प्रथोमपचार केंद्रे व 1 कृत्रिम रेतन केंद्र आहेत.

8.3 - दुग्धव्यवसाय :-

जिल्हयात शेतीकरीता पुरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय करण्यात येतो. जिल्हयात गायी, म्हशी व संकरित जनावरांची संख्या मोठया प्रमाणावर आहे. सहकारी दुग्ध संकलन केंद्रामार्फत शासकीय दुध योजनेतंर्गत दुध संकलन व वितरण केल्या जाते. गोंदिया जिल्हयात 135 पंजीबध्द सहकारी दुग्ध संस्था असून गोंदिया-1,सालेकसा-1 व सडक/अर्जूनी-1 असे एकूण 3 शितगृहे आहेत. शितगृहाची एकूण क्षमता 35 हजार लिटर असून 2016-17 मध्ये दैनंदिन सरासरी दुध संकलन 8.47 हजार लिटर झाले आहे.

9. मत्स्य व्यवसाय

9.1 - मत्स्योत्पादन :-

जिल्हयात नदयांची लांबी 250 कि.मी. असून अनेक तलाव आहेत. त्यामुळे जिल्हयाला तलावांचा जिल्हा म्हणून संबोधण्यात येते. नदया, तलाव व मोठया जलाशयाचे मार्च, 2017 अखेर 21,981 हेक्टर क्षेत्र मत्स्योत्पादनासाठी अनुकूल आहे. या क्षेत्राच्या 74 टक्के क्षेत्र प्रत्यक्ष वापरात आणण्यात आले आहे. मत्स्योत्पादनासाठी उपलब्ध साधनांची लिलाव पध्दतीने विक्री केल्या जाते. सन 2016-17 वर्षात 10945 मे.टन माशांचे उत्पादन झाले व त्यापासून ₹ 76.68 कोटी उत्पन्न मिळाले. जिल्हयात अर्जुनी/मोरगाव तालुक्यात इटियाडोह, गोंदिया तालुक्यात आंभोरा हया ठिकाणी मत्स्यबीज केंद्रे कार्यरत आहेत. सन 2016-17 मध्ये मत्स्यबीज केंद्रात 674 लाख मत्स्यबीज सोडण्यात आलेले होते.

10. सहकार व अधिकोष

10.1 - सहकारी संस्था :-

जिल्हयात 2016-17 वर्षा अखेर सर्व प्रकारचे 1,252 संस्था कार्यरत आहेत व त्यामधील सभासद संख्या 4,86,000 इतकी आहे. जिल्हयातील एकूण 1,252 सहकारी संस्थापैकी 330 कृषी सहकारी संस्था आणि 210 बिगर कृषी पतसंस्था असून 15 पणन संस्था, 353 उत्पादक सहकारी संस्था तर, 344 सामाजिक सेवा सहकारी संस्था आहेत.

जिल्हयात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने 2016-17 वर्षात अल्प मुदतीचे ₹ 166.22 कोटी मध्यम मुदतीचे ₹34.31 कोटी रुपये कर्जाचे वाटप केले तसेच सन 2016-17 मध्ये येणे कर्ज ₹ 473.57 कोटी व थकित कर्ज ₹ 338.92 कोटी आहे .

10.2 - **अधिकोष :-**

जिल्हयात 31 मार्च,2017 रोजी 57 ठिकाणी (शहरे व खेडी धरुन) बँका कार्यरत आहेत. मार्च 2017 अखेर जिल्हयात 131 बँक शाखा आहेत. जिल्हयात अधिकोष शाखा (2011 चे जनगनणेनुसार) लोकसंख्येच्या तुलनेत सरासरी 10,096 लोकसंख्येस एक अधिकोष सेवा उपलब्ध करुन देण्यांत आली आहे. तसेच जिल्हयांत दर लाख लोकसंख्येमागे 10 अधिकोष शाखा आहेत.

11. वीज

11.1 - **विद्युतीकरण :-**

जिल्हयामध्ये 31 मार्च, 2017 पर्यंत 100 टक्के वस्ती असलेल्या गावांचे व शहराचे विद्युतीकरण करण्यात आलेले आहे. ग्रामीण विद्युतीकरणामुळे शेतीमध्ये विद्युत पंप वापरण्याचे प्रमाण वाढले आहे. सन 2016-17 पर्यंत 29,518 शेती पंपांना विज पुरवठा करण्यात आलेला आहे.

11.2 - **वीजेचा वापर :-**

वीजेचा वापर घरगुती, औद्योगिक व शेती अशा विविध कारणांकरीता होतो. 2016-17 मध्ये जिल्हयात 31.1 टक्के घरगुती वापरासाठी, व्यापारी वापरासाठी 4.7 टक्के, 23.2 टक्के औद्योगिक वापरासाठी, 1.3 टक्के सार्वजनिक दिवाबत्ती, 36.4 टक्के कृषी व इतर कारणांकरीता 3.3 टक्के हजार किलो वॅट तास युनिट विजेचा वापर करण्यांत आलेला आहे. गोंदिया जिल्हयात तिरोडा तालुक्यात अदानी पावर प्लॅटव्दारे वीजेचे उत्पादन करण्यात येते.

12. परिवहन व दळणवळण

12.1 - **लोहमार्ग :-**

जिल्हयात 31 मार्च,2017 अखेर 141 कि.मी. लांबीचे लोहमार्ग अस्तित्वात आहेत. जिल्ह्यामधून मुंबई-हावडा रेल्वेमार्ग जातो. तसेच गोंदिया ते चांदा रेल्वे मार्ग जिल्ह्यामधून जातो. गोंदिया येथे रेल्वे जंक्शन आहे. हावडा-मुंबई मार्गावर गोंदिया, गंगाझरी, काचेवानी, तिरोडा, मुंडीकोटा, गुदमा, आमगांव, धानोली, सालेकसा, दरेकसा या ठिकाणी रेल्वे स्टेशन आहेत. तसेच गोंदिया-चांदा मार्गावर गोंदिया, गणखैरा, हिरडामाली, पिंडकेपार, गोंगले, खोडशिवणी, सौंदड, गोंडउमरी, देवलगांव, बाराभाटी, अर्जूनी,वडेगांव,अरूण नगर तर गोंदिया-बालाघाट मार्गावर नागरा धाम,गर्रा,प्रताप बाघ व बिरसोला या ठिकाणी रेल्वे स्टेशन आहेत.

12.2 - **रस्ते :-**

जिल्हयात महाराष्ट्र शासन, जिल्हा परिषद व नगर पालिके मार्फत रस्ते तयार करणे व त्याची निगा राखणे ही कामे प्रामुख्याने केली जातात. 31 मार्च, 2017 अखेर गोंदिया जिल्हयात सार्वजनिक बांधकाम विभाग चे 1780.45 कि.मी., जिल्हा परिषदेचे 5773.21 कि.मी., नगर पालिका हद्दीतील 357.75 कि. मी. लांबीचे असे एकूण 7911.41 कि. मी. लांबीचे रस्ते आहेत. पृष्ठभागाचे वर्गीकरणानुसार जिल्हयात सिमेंट कॉंक्रीटचे 2.5 टक्के, डांबरीकरणाचे 55.3 टक्के, खडीचे व पक्के रस्ते 17.9 टक्के व इतर प्रकारचे 24.3 टक्के रस्ते आहेत. गोंदिया जिल्हयातून मुंबई - कलकत्ता राष्ट्रीय महामार्ग क्र.53 (जुना राष्ट्रीय महामार्ग क्र.6) लांबी 40 किमी आणि नवनिर्मीत कोहमारा -गोंदिया राष्ट्रीय महामार्ग क्र. 543 लांबी 113.6 किमी व बालाघाट-गोंदिया-आमगाव-देवरी राष्ट्रीय महामार्ग क्र. 753 लांबी 95 किमी असे तीन राष्ट्रीय महामार्ग जातात.

12.3 - **नोंदणीकृत वाहने :-**

जिल्हयात 31 मार्च 2017 अखेर एकूण 2,39,592 वाहने वापरात आहेत. त्यापैकी 2,03,488 दुचाकी वाहने व 1276 तीन चाकी वाहने आहेत. तसेच 21,749 चार चाकी वाहने, 5,016 जोड वाहने, 7,837 ट्रॅक्टर व 226 इतर वाहने आहेत.

12.4- **डाक व दूरध्वनी :-**

जिल्हयात 31 मार्च, 2017 अखेर 168 टपाल कार्यालये, 756 पत्रपेटया व 183 पोस्टमन कार्यरत आहेत. तसेच 159 गावात पोस्ट कार्यालयाची सोय उपलब्ध करुन देण्यात आलेली असून दर लाख लोकसंख्येमागे 13 टपाल कार्यालये कार्यरत आहेत. 2016-17 या वर्षात गोंदिया जिल्हयात 6,273 इतकी दुरध्वनी जोडण्याची संख्या आहे.

13. उद्योग व कामगार

13.1 - **उद्योग व कामगार :-**

जिल्हयात सन 2014 मध्ये नोंदणीकृत 121 कारखाने असून चालू स्थितीमध्ये 113 कारखाने आहेत व त्यात 2,683 कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आले आहे. जिल्हयामध्ये अनेक छोटे-मोठे कारखाने असून मोठया प्रमाणात भाताची शेती केली जात असल्याने जिल्हयात उष्णा राईस मिल प्रमुख उद्योग आहे. त्यामुळे तांदूळ उत्पादनाची मोठी बाजारपेठ निर्माण झालेली आहे. त्यापासून कामगारांना मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होतो.

जिल्हयात वनक्षेत्र भरपूर असल्याने तेंदूपत्ता व लाख गोळा करणे हा एक पूरक उद्योग बनलेला असल्याने रोजगार उपलब्ध होत असतो. जिल्हयात दुसरा महत्वाचा उद्योग विडी तयार करणे हा आहे. हया उद्योगाचे गोंदिया, तिरोडा, गोरेगाव व आमगांव तालुक्यात कारखाने कार्यरत असल्याने मोठया प्रमाणात रोजगार उपलब्ध होत आहे.

13.2 - **औद्योगिक वसाहत :-**

गोंदिया जिल्हयात गोंदिया शहरापासून 6 कि. मी. अंतरावर मौजा मुंडीपार येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत 146.14 हेक्टर जमीन संपादित करुन विकास केलेला आहे. या स्थापित जमिनी अंतर्गत 140 भूखंड असून 65 भूखंडावर निरनिराळे उद्योग स्थापन करण्यात आलेले आहेत. सदर दोन्ही वसाहतींमध्ये पाण्याची व विजेची सोय महामंडळाद्वारे करण्यात आली आहे.

गोंदिया मुख्यालयापासून 24 कि. मी. अंतरावर तिरोडा तालुक्यात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे औद्योगिक वसाहतीमध्ये अदानी थर्मल पावर प्लॅन्टची उभारणी व बांधकाम सुरु आहे. यामध्ये प्लॅन्टचे पूर्व नियोजित बांधकाम पूर्ण झाल्यानंतर दर वर्षी 3,300 मेगावॅट विद्युत निर्मिती होणार आहे. पहिल्या फेजमध्ये 660 मेगावॅट विद्युत निर्मितीचे 3 संच उभारण्यात येत असून याद्वारे 1980 मेगावॅट निर्मिती होणार आहे. दुस-या टप्यामध्ये 660 मेगावॅट विद्युत निर्मिती करणारे प्रत्येकी 2 संच उभारण्यात येणार असून याद्वारे 1320 मेगावॅट विद्युत निर्मिती होणार आहे.

13.3-**रोजगार व रोजगार विनिमय:-**

जिल्हयामध्ये रोजगार विनिमय केंद्रांतर्गत ग्रामीण क्षेत्रातील बेरोजगार युवकांना नोंदणी करणे सोयीचे व्हावे, म्हणून जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र, गोंदिया या कार्यालयाकडून महिन्यातून एकदा तालुका स्तरावर पथक पाठविण्यांत येते. तसेच जिल्हयात देवरी येथे आदिवासी भागातील सुशिक्षित बेरोजगार युवक, युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी याकरीता मार्गदर्शन केंद्राची स्थापना करण्यांत आलेली आहे. 31 मार्च, 2017 रोजी जिल्हयातील रोजगार विनिमय केंद्राच्या पटावर एकूण 63,826 उमेदवार आहेत. त्यापैकी 32 लोकांना खाजगी क्षेत्रात रोजगार उपलब्ध झालेला आहे.

13.4- **आर्थिक गणना** 2013 :-

अर्थ व सांख्यिकी संचालनालयामार्फत वर्ष 2013 मध्ये गोंदिया जिल्हयाची सहावी आर्थिक गणना घेण्यात आली असून, सदर आर्थिक गणनेत बिगर कृषी व निवडक कृषी (शेती) या उद्योगातील स्वयंकार्यरत व आस्थापनाविषयक माहितीचा यात समावेश करण्यात आलेला आहे.

13.5 - **कृषी व बिगर कृषी आस्थापना :-**

गोंदिया जिल्हयाची कृषी व बिगरकृषी उद्योगांची संख्या 70,183 असून यापैकी 80.5 टक्के आस्थापना ग्रामीण भागात तर केवळ 19.5 टक्के आस्थापना नागरी भागात कार्यरत आहेत. एकूण आस्थापनापैकी 95.5 टक्के खाजगी तर 0.3 टक्के आस्थापना सहकारी क्षेत्रात व 4.2 टक्के सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत आहेत. एकूण आस्थापनेच्या 13.8 टक्के आस्थापनेचे मालक अनुसूचित जातीचे तर केवळ 8.4 टक्के आस्थापनेचे मालक अनुसूचित जमातीचे आहेत. एकूण आस्थापनापैकी 12.3 टक्के आस्थापना जागाविरहित कार्यान्वित होत्या.विना वेतनी कामगार असलेल्या आस्थापनांची संख्या 80.3 टक्के आहे . तर 19.7 टक्के आस्थापनांमध्ये किमान एकतरी वेतनी कामगार आहे.

13.6 - **कामगार :-**

गोंदिया जिल्हा मिळून कृषी व बिगर कृषी आस्थापनेमध्ये 1,28,009 कामगार काम करीत आहेत. या पैकी 73.5 टक्के कामगार ग्रामीण भागात तर 26.5 टक्के कामगार नागरी भागात काम करीत आहेत. एकूण कामगारांपैकी वेतनावर काम करणारे कामगार 32.8 टक्के होते. जिल्हयातील प्रत्येक आस्थापनेत सरासरी 1.8 कामगार काम करीत आहेत. तर ग्रामीण व नागरी भागातील आस्थापनेकरीता हेच प्रमाण 1.7 व 2.5 असे आहे.

13.7 - **उद्योग गटानुसार वर्गीकरण :-**

गोंदिया जिल्हयात एकूण आस्थापनेपैकी बिगर कृषी या उद्योग गटात किरकोळ व्यापार या उद्योगगटात सर्वाधिक म्हणजे 31.9 टक्के आस्थापना होत्या व त्यामध्ये बिगर कृषी या उद्योग गटातील एकूण कामगारापैकी 26.4 टक्के कामगार काम करीत होते. वस्तुनिर्माण या उद्योगगटाचा दुसरा क्रमांक लागतो. त्यामध्ये एकूण 29.3 टक्के आस्थापना आहेत. कामगार संख्येच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास या आस्थापनेमध्ये 24.4 टक्के कामगार काम करीत आहेत. एकूण आस्थापनेपैकी कृषी या उद्योग गटात 24.4 टक्के आस्थापना आहेत. या आस्थापनेमध्ये 19.2 टक्के कामगार काम करीत आहेत.

13.8 - **सहकार क्षेत्रातील आस्थापना :-**

गोंदिया जिल्हयातील बिगर कृषी सहकार क्षेत्रात असणा-या एकूण 183 आस्थापनांपैकी 143 आस्थापना ग्रामीण भागात तर, 40 आस्थापना नागरी भागात आहेत.

14. शिक्षण

14.1 - **प्राथमिक/माध्यमिक व उच्च शिक्षण :-**

गोदिया जिल्हयात 2016-17 या वर्षी 1297 प्राथमिक शाळा,169 माध्यमिक शाळा, 219 उच्च माध्यमिक शाळा व 52 महाविद्यालये आहेत.तसेच प्राथमिक शाळेत एकूण विद्यार्थी 1,12,401 असुन त्यापैकी मुलींची संख्या 55,142 आहे. माध्यमिक शाळेतील विद्यार्थी 38,270 असुन, त्यापैकी मुलींची संख्या 18,639 एवढी आहे.उच्च माध्यमिक शाळेतील एकूण विद्यार्थी 1,06,621 असुन त्यापैकी मुलींची संख्या 52,168 आहे. तर महाविद्यालयीन एकूण विद्यार्थी 17,523 असुन मुलींची संख्या 10,053 आहे.

अशाप्रकारे एकूण विद्यार्थी 2,74,815 असून त्यापैकी मुलींची संख्या 1,36,002 आहे.अनुसूचित जातीचे एकूण विद्यार्थी 35,581 व अनुसूचित जमातीचे 46,752 विद्यार्थी आहेत.जिल्ह्यामध्ये प्राथमिक शाळेतील शिक्षक संख्या 5,436 , माध्यमिक शाळेतील शिक्षक संख्या 1,520 ,उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षक संख्या 3,257 तर, महाविद्यालयीन शिक्षकांची संख्या 355 आहे.

15. सार्वजनिक आरोग्य व वैद्यकीय सेवा

15.1 - वैद्यकीय सेवा :-

गोंदिया जिल्ह्यात वैद्यकीय सेवामध्ये मार्च, 2017 अखेर जिल्ह्यात रुग्णालये 12, प्रसुतीगृहे 1, प्राथमिक आरोग्य केंद्रे 40 कार्यरत असून वैद्यकीय सेवात वाढ झाल्यामुळे मृत्यूच्या दरात घट झाल्याचे दिसून येते. गोंदिया जिल्हयामध्ये मार्च, 2017 अखेर 42 कुटूंब नियोजन केंद्र कार्यरत आहेत. या केंद्रातून स्त्रियांवर 6,892 कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया व 1,534 पुरुषांवर नसबंदी शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

मानव विकास अहवाल 2012 नुसार राज्याचा मानव विकास निर्देशांक 0.752 असुन जिल्हयाचा निर्देशांक 0.701 आहे. जिल्हयाचा राज्यात 21 वा क्रमांक आहे.

16. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना

16.1 - रोजगार निर्मिती :-

गोंदिया जिल्हयात ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन 2016-17 मध्ये एकूण ₹ 15469.06 लाख खर्च करण्यात आले असून, 73.54 लाख मनुष्य दिवस रोजगार निर्मिती झालेली आहे.

17. संकीर्ण

17.1 - जमीन महसूल :-

गोंदिया जिल्हयात सन 2016-17 मध्ये एकत्रित जमीन महसूलाची प्रत्यक्ष वसूलीस पात्र रक्कम ₹ 3472.14 लाख रुपये होती. त्यापैकी प्रत्यक्षात वसूली ₹ 1347.79 लाख रुपये झालेली आहे.

17.2 - वाचनालय, वृत्तपत्रे व नियतकालिके :-

मार्च, 2017 रोजी गोदिया जिल्हयात दैनिक वर्तमानपत्रे 9 व साप्ताहिके 16 प्रकाशीत केले जातात.

17.3 - पोलीस आस्थापना :-

31 मार्च, 2017 रोजी गोंदिया जिल्हयांत 16 पोलीस ठाणे, 15 आऊट पोष्ट, 6 पोलीस चौकी, 14 लॉकप्सची सोय आहे. जिल्हयातील पोलीस कर्मचारी व अधिका-याची एकूण संख्या 2634 असून पैकी महिलांची संख्या 385 आहे तसेच 412 होमगार्ड पैकी महिला 55 असल्याचे दिसून येते.

गोंदिया जिल्हयांत कार्यरत विविध न्यायालयांनी सन 2016-17 मध्ये एकूण 10141 प्रकरणे निकाली काढलेले आहे.

17.4 - करमणूक :-

गोंदिया जिल्हयात 31 मार्च, 2017 रोजी 6 कायम स्वरुपाची चित्रपटगृहे अस्तित्वात आहेत. तसेच एकूण 51 केबल चालक असून यापासून सन 2016-17 या वर्षात ₹6,210.78 हजार उत्पन्न शासनास प्राप्त झाले आहे.

18. प्रेक्षणीय स्थळे व पर्यटन

18.1 - प्रेक्षणीय स्थळे :-

गोंदिया जिल्हयात इटियाडोह, नवेगांवबांध, पुजारीटोला, कालीसराड, सिरपूर, चोरखमारा, बोदलकसा इत्यादी मोठी धरणे असून, ही प्रेक्षणीय स्थळे सुध्दा आहेत. नवेगांव बांध राष्ट्रीय उद्यान व नागझिरा अभयारण्य हे प्रेक्षणीय स्थळे याच जिल्हयात आहेत. जिल्हयाला अतिप्राचीन हिन्दु, बौध्द व जैन संस्कृतीचा वारसा लाभलेला आहे. प्रतापगड येथे पुरातन शिवमंदीर, पुरातन किल्ला व हजरत ख्वाजा उस्मान गनीशाह हारूनी बाबा दर्गा, माँ गंगाजमूनादेवी-बोंडगांव, बाबा शशीकरण देवस्थान-डुग्गीपार, माँ मांडोदेवी देवस्थान-तेढा, कोपाललिंगो देवस्थान-कचारगड, माँ गडमाता मंदीर-सालेकसा, श्री.चक्रधर स्वामी देवस्थान-डाकराम सुकडी, माँ धुकेश्वरी देवस्थान-देवरी, श्री नाथ बाबा महादेव पहाडी-आमगांव, लहरी आश्रम-कामठा व भैरव मंदीर-नागरा तसेच पदमपूर येथे दगडी इमारती असून प्राचीन कालीन विष्णू व सरस्वती हया हिंदू देवताच्या व जैन तिर्थकारांच्या मुर्त्या आढळतात. सालेकसा तालुक्यात दर्रेकसा जवळ चांदसूरज पहाडावर एक वैशिष्टयपूर्ण गुहा आहे. चैत्र पौर्णिमेला अर्जुनी/मोरगाव तालुक्यातील बोंडगाव(देवी) येथे गंगा-जमूना देवीची यात्रा भरते. अर्जुनी/मोरगांव तालुक्यातील प्रतापगड पहाडावर महाशिवरात्रीला यात्रा भरते. सडक-अर्जुनी तहसील मध्ये नागझिरा वन्यजीव अभयारण्य असून या ठिकाणी पर्यटकांना थांबण्यासाठी वनविभाग व पाटबंधारे विभागाची विश्रामगृहे आहेत.

सन 2016-17 मध्ये जिल्हयात 13 ' क ' वर्ग पर्यटन स्थळे असून त्यांवर ₹ 334.96 लक्ष खर्च झालेला आहे.

दृष्टिक्षेपात जिल्हा

जिल्हा-गोंदिया

2017

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन- 2017

दृष्टिक्षेपात जिल्हा

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
1	2	3	4	5
एक	**प्राकृतिक रचना**			
1	**भौगोलिक स्थान**			
1.1	उत्तर अक्षांश	अंश	20.39-21.38	16.4-22.1
1.2	पूर्व रेखांश	अंश	79.27-80.42	72.6-80.9
1.3	क्षेत्रफळ	हजार चौ.कि.मी.	5	308
2	**प्रशासकीय रचना**			
2.1	तालुके	संख्या	8	355@@
2.2	शहरे (गणना शहरांसह)	संख्या	10	534
2.3	वस्ती असलेली गावे	संख्या	883	40,959
2.4	वस्ती नसलेली गावे	संख्या	59	2,706
@@ मुंबई व मुंबई उपनगर जिल्हयांमधील ३ तालुके वगळून				
दोन	**स्थानिक स्वराज्य संस्था**			(2016-17)$
1	महानगरपालिका	संख्या	0	27
2	नगरपरिषदा	संख्या	2	234
3	कटक मंडळे	संख्या	0	7
4	पंचायत समित्या	संख्या	8	351
5	ग्रामपंचायती	संख्या	553	28,332
6	नगरपंचायत	संख्या	6#	124
$ राज्य निवडणूक आयोगाच्या अहवालानुसार (दि.31.12.2016 रोजीची)				
तीन	**लोकसंख्या (जनगणना-2011)**			
1	ग्रामीण	हजार	1,097	61,556
2	नागरी	हजार	226	50,818
3	एकूण	हजार	1,323	1,12,374
4	पुरुष	हजार	662	58,243
5	स्त्रिया	हजार	661	54,131
6	स्त्रिया प्रति हजार पुरुष	संख्या	999	929
7	अनुसूचित जातींची लोकसंख्या	हजार	176	13,276
7.1	एकूण लोकसंख्येशी प्रमाण	टक्के	13.3	11.8
8	अनुसूचित जमातींची लोकसंख्या	हजार	214	10,510
8.1	एकूण लोकसंख्येशी प्रमाण	टक्के	16.2	9.4
9	घनता (लोकसंख्या प्रति चौ.कि.मी.)	संख्या	253	365
10	**साक्षरतेचे प्रमाण**			
10.1	ग्रामीण	टक्के	83.6	77.0
10.2	नागरी	टक्के	91.5	88.7
10.3	एकूण	टक्के	85.0	82.34
10.4	पुरुष	टक्के	92.0	88.38
10.5	स्त्रिया	टक्के	77.9	75.87
10.6	साक्षरतेमध्ये महाराष्ट्राचा देशात क्रमांक	क्रम संख्या	-	बारावा
11	दारिद्रय रेषेखालील ग्रामीण कुटुंबे (2002)	लाख	1.44	45.19

#टिप :-जिल्हयात दिनांक 12/2/2015 रोजी 6 नगर पंचायती अस्तीत्वात आलेल्या आहेत.पैकी आमगांव नगर पंचायतीचे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-2017
दृष्टिक्षेपात जिल्हा

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
1	2	3	4	5
चार	**जिल्हा उत्पन्न अंदाज**			
1	**चालू किंमतीनुसार**		2013-14	2015-16+
	1.1 एकूण उत्पन्न (स्थूल)	₹ कोटी	10200	2,001,223
	1.2 दरडोई उत्पन्न (स्थूल)	₹	75102	1,68,677
	1.3 एकूण उत्पन्न (निव्वळ)	₹कोटी	9,326	17,48,771
	1.4 दरडोई उत्पन्न (निव्वळ)	₹	68,665	1,47,399
2	**स्थिर (2011-12) किंमतीनुसार**		2013-14 €	2015-16+
	2.1 एकूण उत्पन्न (स्थूल)	₹ कोटी	5,810	16,59,776
	2.2 दरडोई उत्पन्न (स्थूल)	₹	42777	1,39,898
	2.3 एकूण उत्पन्न (निव्वळ)	₹कोटी	5,266	14,41,675
	2.4 दरडोई उत्पन्न (निव्वळ)	₹	38,772	1,21,515
+ प्रथम सुधारित अंदाज		€ स्थिर (2004-05) किंमतीनुसार		
पाच	**कृषि**		2011-12	2014-15*
1	भौगोलिक क्षेत्र	हजार हेक्टर	518	30,758
2	जंगलव्याप्त क्षेत्र	हजार हेक्टर	148	5,201
3	जंगलव्याप्त क्षेत्राचे भौगोलिक क्षेत्राशी प्रमाण	टक्के	28.5	16.91
4	शेतीला उपलब्ध नसलेली जमीन			
	4.1 बिगर- शेती वापराखालील	हजार हेक्टर	24	1,482
	4.2 पडीत आणि लागवडीलायक नसलेली	हजार हेक्टर	35	1,727
	4.3 एकूण	हजार हेक्टर	70	3,209
5	पडीत जमिनीव्यतिरिक्त लागवड न केलेली इतर जमीन		2011-12	2014-15*
	5.1 कायम गुरेचरण व इतर	हजार हेक्टर	45	1,249
	5.2 झाडे- झुडपांखालील	हजार हेक्टर	1	249
	5.3 लागवडीलायक परंतु पडीत	हजार हेक्टर	0	919
6	पडीत जमीन			2014-15*
	6.1 चालू पड	हजार हेक्टर	6	1,399
	6.2 इतर पड	हजार हेक्टर	18	1,188
7	पिकाखालील क्षेत्र			2014-15*
	7.1 निव्वळ पेरणी क्षेत्र	हजार हेक्टर	242	17,344
	7.2 दुसोटा / तिसोटा क्षेत्र	हजार हेक्टर	32	5,929
	7.3 एकूण पिकाखालील क्षेत्र	हजार हेक्टर	274	23,273
8	ओलिताखालील क्षेत्र / सिंचनाखालील क्षेत्र			2014-15
	8.1 निव्वळ ओलित क्षेत्र	हजार हेक्टर	102	उ.ना
	8.2 एकूण ओलित क्षेत्र	हजार हेक्टर	114	उ.ना
9	महत्वाच्या पिकाखालील क्षेत्र			2015-16^
	9.1 तृणधान्ये	हजार हेक्टर	237	7,667
	9.2 कडधान्ये	हजार हेक्टर	20	3,544
	9.3 तेलबिया	हजार हेक्टर	2	4,195
	9.4 ऊस (तोडणी क्षेत्र)	हजार हेक्टर	1	987
	9.5 कापूस	हजार हेक्टर	0	4,207
10	पर्जन्य (सरासरी) 2015	मि.मी.	1071	1278.30
11	जमीन वहिती धारण क्षेत्र			2010-11
	11.1 क्षेत्र 2 हेक्टरपेक्षा कमी	हजार हेक्टर	143	8,925
	11.2 क्षेत्र 2 ते 10 हेक्टर	हजार हेक्टर	60	9,758
	11.3 क्षेत्र 10 हेक्टरपेक्षा जास्त	हजार हेक्टर	4	1,084
* अस्थायी	^माहीती अंतीम अनुमानावर आधारीत आहे.			

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-2017

दृष्टिक्षेपात जिल्हा

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
1	2	3	4	5
सहा	**अंशत: व पूर्णत: सिंचन क्षमता निर्माण झालेले पाटबंधारे प्रकल्प व त्या खालील क्षेत्र**			30 जून, 2016 पर्यंत
1	मोठे पाटबंधारे प्रकल्प	संख्या	4	403 $
	1.1 लाभक्षेत्र (निर्मित सिंचन क्षमता)	हजार हेक्टर	66	3,466*^
2	मध्यम पाटबंधारे प्रकल्प	संख्या	7	} अ.क्र. 1 मध्ये समाविष्ट
	2.1 लाभक्षेत्र (निर्मित सिंचन क्षमता)	हजार हेक्टर	86	
3	लघुपाटबंधारे प्रकल्प (राज्यक्षेत्र)	संख्या	20	3506$
	3.1 लाभ क्षेत्र	हजार हेक्टर	18	1444*^
4	लाभक्षेत्रातील विहिरींद्वारे 2015-16 मधील अतिरिक्त सिंचन क्षेत्र	हजार हेक्टर	6	785
$ पूर्ण व प्रगती पथावरील घटकांची संख्या, * अस्थायी, @. ^जून 2015 पर्यंत निर्मित				
सात	**पशुसंवर्धन (पशुगणना -2012)**			
1	एकूण पशुधन	हजार	585	32,489*
2	गो जातीय	हजार	338	15,484
3	महिष वर्गीय	हजार	88	5,595
4	मेंढया व शेळ्या	हजार	158	11,016
5	कोंबडया व बदके	हजार	379	77,795@^
*इतर पशुधनासह (इतर पशुधन या बाबीमध्ये डुकरे, घोडे व शिंगरे, खेचरे, गाढवे यांचा समावेश करण्यात आला आहे.) @ कोंबडया व बदके यांमध्ये तुर्की, क्वेल व इतर कुक्कुट पक्षी यांचाही समावेश करण्यात आला आहे. ^ एकूण कोंबडया व बदके संख्येमध्ये पोल्ट्री फार्म मधील पक्षी समाविष्ट आहेत.				
आठ	**सहकार क्षेत्र**		31/03/2017	31/03/2016*
1	सहकारी संस्था	संख्या	1252	1,96,907
2	प्राथमिक कृषि सहकारी पतसंस्था	संख्या	289	21,102
	2.1 सभासद संख्या	हजार	239	15,065
	2.2 दिलेली कर्जे	₹ लाख	380	13,29,300
	2.2 येणे कर्जे	₹ लाख	879	12,78,300
3	सहकारी दुग्ध संस्था (31 मार्च 2017 अखेर)	संख्या	135	14,921*
* अस्थायी				
नऊ	**वीज**			31/03/2017 अखेर
1	विद्युतीकरण झालेली गावे	संख्या	883	41,201
2	वीज पुरवठा केलेले कृषी पंप संच	हजार	30	4,081
3	विजेचा वापर			2015-16
	3.1 घरगुती	दशलक्ष कि.वॅ.तास	163.900	27,001
	3.2 वाणिज्यिक	दशलक्ष कि.वॅ.तास	24.760	13,182
	3.3 औद्योगिक	दशलक्ष कि.वॅ.तास	122.540	40,231
	3.4 कृषि	दशलक्ष कि.वॅ.तास	191.930	28,236
	3.5 इतर + सार्वजनिक दिवाबत्ती	दशलक्ष कि.वॅ.तास	24.000	8,093
	3.6 एकूण	दशलक्ष कि.वॅ.तास	527.130	1,16,743
दहा	**परिवहन व दळणवळण**			31/03/2016
1	रेल्वे मार्गाची एकूण लांबी	कि.मी.	141	6,127*
*कोकण रेल्वेच्या 381 किमी लांबीसह				
2	रस्त्यांनी जोडलेली गावे			(31/03/2015 अखेर)
	2.1 बारमाही	संख्या	942	41,217
	2.2 हंगामी	संख्या	-	462
3	रस्त्यांची लांबी (पृष्ठांकित)			2015-16
	3.1 राष्ट्रीय महामार्ग	कि.मी.	248.60	7,438
	3.2 राज्य महामार्ग (प्रमुख राज्य महामार्गासह)	कि.मी.	530.72*	38,510*
	3.3 प्रमुख जिल्हामार्ग	कि.मी.	1001.13	50,844
	3.4 इतर जिल्हामार्ग	कि.मी.	1689.08	58,116
	3.5 ग्रामीण रस्ते	कि.मी.	4441.88	1,45,881
	3.6 एकूण	कि.मी.	7911.41	3,00,789
* राज्य महामार्गात प्रमुख राज्य महामार्गांचा समावेश आहे.				

जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन-2017

दृष्टिक्षेपात जिल्हा

अ.क्र.	बाब	परिमाण	जिल्हा	महाराष्ट्र
1	2	3	4	5
अकरा	**नोंदणीकृत कारखाने व रोजगार**		2014	2014
1	नोंदणीकृत कारखाने	संख्या	121	38,909
2	नोंदणीकृत चालू कारखाने	संख्या	113	36,803
	(त्यांतील कामगार)	संख्या	2683	20,24,525
3	नोंदणीकृत साखर कारखाने *	संख्या	0	202*
	(साखरेचे उत्पादन)@	लाख मे. टन	0	55.81@
* 31 मार्च 2016 रोजीची अस्थायी आकडेवारी @ ऑक्टोबर ते सप्टेंबर करीता				
4	सहकारी सूत गिरण्या	संख्या	0	278*
* 31 मार्च 2016 रोजीची अस्थायी आकडेवारी				
